**<u>नियमित दरखास्त क्र.११३/२०१८</u>**
**<u>निशाणी क्रमांक ७०</u>**

**<u>सरतपास ऋणको तर्फे वकील श्री एस. एन. शिंदे यांचे मार्फत शपथेवर सुरु :-</u>**

माझे सरतपासाचे प्रतिज्ञापत्रातील मजकुर माझे माहितीप्रमाणे व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर असुन त्यावर माझी सही आहे.

**<u>उलटतपास धनकोतर्फे विधीज्ञ श्री पी. आर. मालपाणी यांचेकडून सुरुः</u>**

माझे बी. ए. मध्ये पदवीधर शिक्षण झालेले आहे. माझे जमिनीच्या गट नंबर २५३/५ असा आहे. ते क्षेत्र ३५ आर असुन त्यापैकी ३२ आर क्षेत्र लागवड योग्य असुन ३ आर क्षेत्र पोटखराबा आहे. गट नंबर २५३ चे किती पोटक्षेत्र आहे व कोणाचे किती क्षेत्र आहे हे मला माहिती नाही. हे म्हणणे बरोबर आहे की, माझे जमिनीचे केवळ ३५ आर क्षेत्र आहे, त्यापेक्षा जास्त क्षेत्र नाही.

माझे क्षेत्राच्या पूर्व बाजूस भास्कर राधुजी गायकवाड यांचे क्षेत्र आहे. पश्चिमेला सुशिला शिंदे यांचे क्षेत्र आहे. भास्कर गायकवाड यांचे क्षेत्राचा गट नं २५४ असुन सुशिला शिंदे यांचा गट नंबर २५३ आहे. हे मला माहित नाही की, सुजित थोरात यांनी उपअधिक्षक भूमी अभिलेख यांचेकडे २५३ चा पोटहिस्सा मोजणीसाठी अर्ज केला होता. हे मला माहित नाही की, मोजणी नंतर हिस्सा नंबर ४ हा तयार झाला. मी उत्तम मारुती गायकवाड व मला दोन भाउ गुलाब मारुती गायकवाड व दत्तु मारुती गायकवाड असे दोन भाउ आहेत. आता मला नि. ४७ चा मोजणीदाराचा जबाब दाखविण्यात आला त्यावर माझी सही आहे. तसेच नि. ५१ हिस्सा फॉर्म नंबर ४ वर माझी सही आहे. नि. ४७ व नि. ५१ वरनि. ४७ व नि. ५१ वर मोजाणीदार यांनी सहया घेतल्या होत्या, त्या सहया घेतल्याबद्दल कोणतीही तक्रार केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्या मोजणी अहवालानुसार माझे ताब्यामध्ये ३५ आर ऐवजी ७० आर क्षेत्र असल्याचे निष्पन्न झाले. दावा झाल्यानंतर मी गट नं. २५३ च्या पोटहिश्श्यांची चौकशी केली नाही. गट नंबर २५३/६ हा सुजित गायकवाड व सागर गायकवाड यांच्या नावाने तयार झाला आहे याची मला माहिती नाही. मी गट नं. २५३/६ चा उतारा तयार झाल्याबद्दल तहसीलदार, प्रांत अधिकारी व कलेक्टर यांचेकडे तक्रार केली नाही. मोजणीदार भगीरथ चव्हाण यांच्याबरोबर माझा कोणताही वाद नव्हता व नाही. मी मोजणीदार भगीरथ चव्हाण यांच्याविरुध्द त्यांच्या वरिष्ठांकडे कधीही तक्रार केलेली नाही. रे. मु. नं. ४८३/२०११

मध्ये झालेल्या निवाडयाच्या विरुध्द मी अपिल केलेले नाही.

माझे गट नंबरच्या पश्चिमेला सुशिला शिंदे यांचा पोटहिस्सा आहे, त्याचा नंबर मला माहित नाही. माझे पोटहिश्श्याचा नंबर २५३/५ आहे. हे मला माहित नाही की, दावा दाखलपासुन सागर व सुजित यांच्या पोट हिश्श्याचा गट नं. २५३/६ असा आहे. हे म्हणणे बरोबर आहे की, २५३ चे जे सहा पोटहिस्से तयार झालेले आहेत ते पुर्वेकडून पश्चिमेकडे असे आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सुजित व सागर यांचे एकुण ३८ आर क्षेत्र जे माझे जमिनीच्या पूर्व बाजूस असून भास्कर पवार यांच्या लगत आहे, ते त्यांना करण्यास हरकत करतो व ते मी माझे ताब्यात घेतले आहे. हे म्हणणे खरे नाही की, न्यायालयाचा मनाई हुकूम असतांना सुध्दा मी सुजित व सागरचे क्षेत्र ताब्यात ठेवण्यासाठी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृती,

**(दि. ह. दाभाडे)**
३ रे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर,
संगमनेर.

दिनांक :२१/०६/२०२४